जाहिर नोटीस

तमाम लोकांना (दुकानदार) कळविणेत येते की, दिवाणी न्यायालय (क.स्तर), कणकवली येथील खाली नमुद Kiosk machine दुरुस्त करावयाचे आहे. दुरुस्तीसाठी इच्छुक एकल व्यापारी/संस्था यांचेकडून याद्वारे दरपत्रके मागविणेत येत आहेत. सदर दुरुस्त करावयाच्या Kiosk machine चा तपशील खालीलप्रमाणे आहे.

तपशील

अ. क्र.	नाव	सिरियल नंबर	मशीनची मूळ किंमत	चालू स्थितीत/बंद स्थितीत
1	Kiosk machine	IN1805207	९८,८८९.९०/-	बंद स्थितीत

अटी व शर्ती –

१. दरपत्रके सादर करताना ती बंद लखोट्यातून सादर करण्यात यावीत.

२. लखोट्यावर 'Kiosk machine दुरुस्तीबाबत दरपत्रक' असा उल्लेख करणेत यावा.

३. दरपत्रक सादर करणाऱ्या पुरवठादार यांची वस्तू व सेवा करारांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

४. जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

५. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करण्याल येईल. विचार करणेत आलेल्या दरपत्रकाप्रमाणे Kiosk machine दुरुस्त झालेनंतर देयकाची रक्कम संबंधितांना अदा करणेत येईल.

६. दरपत्रक सादर करणेपूर्वी वर नमुद नादुरुस्त संगणक उपकरण कार्यालयीन वेळेत दिवाणी न्यायालय क. स्तर, कणकवली येथे येऊन पहाता येईल.

तरी इच्छुकांनी (दुकानदारांनी) आपली दरपत्रके सदर नोटीस प्रसिद्ध झालेचे दिनांकापासून दहा दिवसांचे आत या न्यायालयाकडे सादर करावीत.

दि. ११.०८.२०२५

सहायक अधिक्षक (वित्त)
दिवाणी न्यायालय (क.स्तर) कणकवली

म.जा.क्र. ४८५१ सन २०२५
दिवाणी न्यायालय (क.स्तर), कणकवली
दि. ११.०८.२०२५

प्रत:– माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, दोडामार्ग, देवगड (ई–मेलद्वारे)
५. मा. सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
६. मा. तहसिलदार, कणकवली
७. मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कणकवली.
८. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कणकवली यांचे न्यायालयातील नोटीसबोर्डावर.

(सदर जाहिर नोटीस मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेस नम्र विनंती आहे.)

शाखा वित्त संगणक
शाखेत दिनांक १२/८/२०२५
मराठी आवक क्र. –६८३९

अधीक्षक (प्रशासन)
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस